

कृष्णा - कोयना

नागरी सहकारी पतसंस्था मर्या; कराड

प्रशासकीय कार्यालय : १३५ /२, मंगळवार पेठ,
कराड जि.सातारा ४१५११०

www.krishnakoyanapatsanstha.in

ऑडिट वर्ग 'अ'



४९ वा

वार्षिक अहवाल

सन २०२५-२६

"आपल्या आर्थिक ध्येयासाठी सदैव पाठीशी"

* संचालक मंडळ *

श्री. बाळासो शामराव पाटील
चेअरमन

श्री. अरूण शंकर पाटील
महाव्यवस्थापक

श्री. सचिन विठ्ठल चव्हाण
व्हा. चेअरमन

श्री. आनंदराव भाऊसो पाटील
संचालक

श्री. सुरेश रघुनाथ शिंदे
संचालक

श्री. अभय धोंडीराम धोपाटे
संचालक

श्री. दत्तात्रय धोंडूसा कलबुर्गी
संचालक

श्री. प्रकाश यशवंत पाटील
संचालक

श्री. सुभाष केशव काळे
संचालक

श्री. प्रशांत अरूण पाटील
संचालक

श्री. यशवंत विठ्ठल ढेबे
संचालक

श्री. महेश शिवाजी कांबळे
संचालक

श्वेता अरूण पाटील
संचालिका

सौ. रोहिणी रामचंद्र लाखोले
संचालिका

कृष्णा – कोयना नागरी सहकारी पतसंस्था मर्या; कराड.

प्रशासकीय कार्यालय,१३५/२, मंगळवार पेठ, कराड
ता. कराड, जि. सातारा. फोन नं. (०२१६४) २२१०४१

* वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस *

(फक्त सभासदांकरीता)

स.न.वि.वि.

कृष्णा – कोयना नागरी सहकारी पतसंस्था मर्या; कराड. या संस्थेची "41" वी वार्षिक सर्वसाधारण **सभा रविवार दि.30.08.2026 रोजी सकाळी ठीक 11.00** वाजता **" कल्याणी पॅलेस " वाखाण रोड, कराड** येथे संस्थेचे चेअरमन मा.श्री.बाळासो शामराव पाटील यांचे अध्यक्षतेखाली बोलविणेत आली आहे. तरी संस्थेच्या सर्व सभासदांनी सभेस वेळेत उपस्थीत रहावे ही विनंती.

सभेपुढील विषय

1) मागील दि.10.08.2025 रोजी झालेल्या 40 व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा वृतांत वाचून कायम करणे .
2) मा.संचालक मंडळाने सादर केलेले सन 2025-2026 सालचे ताळेबंद व नफा तोटा पत्रकास वाचून मंजूरी देणे.
3) मा. संचालक मंडळाने सुचविलेल्या सन 2025-2026 च्या नफा वाटणीस मंजूरी देणे .
4) सन 2025-2026 चे वैधानिक लेखातपासणी अहवालाची नोंद घेणे.
5) सन 2024-2025 चे वैधानिक लेखातपासणी दोष दुरूस्ती अहवालाची नोंद घेणे.
6) सन 2026-2027 चे अंदाज पत्रकास मंजूरी देणे व सन 2025-2026 चे अंदाज पत्रकापेक्षा कमी /जास्त झालेल्या खर्चास मंजूरी देणे .
7) सन 2026-2027 सालाकरीता वैधानिक लेखापरीक्षक यांची नेमणूक करणे व त्यांचा मेहनताना ठरविणे.
8) मा.संचालक मंडळ व नातेवाईक यांचे कर्जाची नोंद घेणे .
9) संस्थेच्या शाखा कार्यालयाकरीता स्वत:च्या मालकीची जागा अथवा इमारत खरेदी करणेस मंजूरी देणे
10) संस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेस अनुपस्थित असणाऱ्या सभासदांची अनुपस्थिती क्षमापीत करणे.
11) मा. अध्यक्षसो यांचे परवानगीने आयत्या वेळी येणारे विषयावर विचार करणे .
12) आभार व समारोप.

स्थळ : कराड
दिनांक : **14.08.2026**

मा.संचालक मंडळाचे आदेशावरून
श्री.अरुण शंकर पाटील
महाव्यवस्थापक

सूचना :

1) गणपुर्ती अभावी सभा तहकुब झाल्यास सदरची सभा त्याच दिवशी, त्याच ठिकाणी ठरलेल्या वेळेपेक्षा अर्धा तास उशिरा घेतली जाईल व त्या सभेस गणसंख्येची आवश्यकता असणार नाही.
2) सभासदांनी सभेपूढे ठेवावयाच्या आपल्या लेखी सूचना, वार्षिक सर्वसाधारण सभेपूर्वी किमान 4 दिवस अगोदर संस्थेच्या मुख्य कार्यालयाकडे पाठवाव्यात.
3) दि.31.03.2026 अखेरील ताळेबंद व नफा तोटा पत्रक व वार्षिक अहवाल संस्थेच्या वेबसाईट www.krishnakoyanapatsanstha.in व मुख्य कार्यालयासह सर्व शाखाचे नोटीस बोर्डवर प्रसिद्ध करणेत आलेला आहे.
4) सभेस येताना आपली सभेची नोटिस प्रत सोबत आणावी ही विनंती.

कृष्णा – कोयना नागरी सहकारी पतसंस्था मर्या; कराड

सभासदांसाठी सूचना व नियमावली

1. प्रत्येक सभासदाने आपल्या निवासी अथवा पत्रव्यवहाराच्या पत्त्यात, मोबाईल क्रमांकात किंवा इतर वैयक्तिक माहितीत कोणताही बदल झाल्यास त्याची लेखी माहिती आवश्यक कागदपत्रांसह संस्थेच्या मुख्य कार्यालय, 135/2, मंगळवार पेठ, कराड येथे सादर करावीत.
2. सर्व सभासद व ग्राहकांनी आपल्या खात्याशी संबंधित के.वाय.सी. (KYC) कागदपत्रांची पूर्तता वेळेत करावी. अपूर्ण के.वाय.सी. असलेल्या खात्यांवरील व्यवहार नियमानुसार मर्यादित होऊ शकतात.
3. संस्थेच्या आर्थिक प्रगतीसाठी प्रत्येक सभासदाने नियमित बचत करून संस्थेमध्ये ठेवी ठेवाव्यात व संस्थेच्या विविध आर्थिक योजनांचा लाभ घ्यावा.
4. ठेवींवरील व्याजदरांमध्ये बाजारपेठेतील परिस्थितीनुसार बदल होत असले तरी संस्थेने चालू वर्षी 10 % लाभांश जाहीर केलेला आहे.
5. एका व्यक्तीगत सभासदास कमाल रु. 5,00,000/- पर्यंतचे शेअर्स धारण करता येतील. ज्या सभासदांनी अद्याप शेअर प्रमाणपत्रे (Share Certificates) स्वीकारलेली नाहीत त्यांनी ती त्वरित संस्थेकडून प्राप्त करून घ्यावीत.
6. सहकारी कायदा, नियम व संस्थेच्या उपविधीनुसार सभासदांनी धारण केलेल्या भागभांडवलाची (Shares) अंशतः परतफेड करता येणार नाही. याबाबतचे सर्व व्यवहार विद्यमान नियमांनुसारच होतील.
7. कर्जाची आवश्यकता असल्यासच कर्ज घ्यावे. घेतलेल्या कर्जाचा वापर मंजूर उद्देशासाठीच करावा. अनावश्यक कर्ज घेणे टाळावे, कारण त्याचा आर्थिक नियोजनावर व दैनंदिन जीवनावर प्रतिकूल परिणाम होऊ शकतो.
8. कर्जाचे हप्ते व व्याज मुदतीत नियमितपणे भरून आपली पत, विश्वासार्हता व संस्थेची आर्थिक शिस्त कायम राखण्यास सहकार्य करावे.
9. वेळेवर कर्जफेड केल्यामुळे इतर गरजू सभासदांनाही कर्जसुविधा उपलब्ध होण्यास मदत होते. तसेच आपण ज्या कर्जदारास जामीनदार असाल, त्याच्या कर्जफेडीवर नियमित लक्ष ठेवणे ही जामीनदाराची नैतिक व कायदेशीर जबाबदारी आहे.
10. प्रत्येक सभासदाने आपल्या भागभांडवलाची रक्कम किमान रु. 2,500 /- पर्यंत पूर्ण करून संस्थेच्या भांडवली बळकटीस सहकार्य करावे.
11. संस्थेचे उपविधी, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, 1960 व त्याअंतर्गत करण्यात आलेले नियम, तसेच संचालक मंडळाने वेळोवेळी घेतलेले निर्णय यांचे पालन करणे प्रत्येक सभासदावर बंधनकारक राहील.

आमचे वेगळेपण		ठेवीवरील व्याजदर		
1	ISO 9001 : 2015 मानांकन प्राप्त संस्था		ठेवीचा प्रकार	व्याजदर
2	बँको ब्लु रिबन - 2018 पुरस्कार प्राप्त संस्था	1	सेव्हिंग ठेव	4.00 %
3	संस्थेचा IFSC Code : ICIC0000106	2	कॉल डिपॉझीट ठेव 25 दिवस ते 45 दिवस	5.50 %
4	NEFT/RTGS सुविधा	3	46 दिवस ते 90 दिवस	6.00 %
5	सर्व प्रकारची बिले भरण्याची ऑनलाइन सुविधा	4	91 दिवस ते 180 दिवस	7.00 %
6	कार्यक्षेत्र सातारा जिल्हा	5	181 दिवस ते 1 वर्ष	8.00 %
7	आकर्षक व्याजदराच्या विविध ठेव योजना	6	1 वर्षे 1 दिवस व त्यावरील	9.00 %
8	अनुभवण्यासारखी आपुलकीची तत्पर सेवा	7	दाम दिडपट ठेव	4 वर्ष 3 महिने 25 दिवस
9	सुलभ व तात्काळ गरजेनुसार कर्ज वितरण	8	दाम दुप्पट ठेव	7 वर्ष 4 महिने 18 दिवस
10	संस्थेचे पूर्णतः संगणकिकरण ,कोअर बँकिंग प्रणाली	9	क्युम्युलेटिव्ह ठेव	9.75 %
11	अनुभवी व प्रशिक्षित सेवक			
12	लॉकर्स सुविधा		जेष्ठ नागरीक (60 वर्षे पूर्ण वय) करीता 0.50 % जादा व्याजदर	
13	मोबाईल बँकिंग सुविधा			

कायदेविषयक सल्लागार	व्हॅल्युएटर्स...
ॲड.डी.एच. पवार	श्री. अशोक दिनकर कदम
ॲड. एम. व्ही. कुलकर्णी	हिंगमिरे व्हॅल्युएटर्स अँड सर्वेअर्स
ॲड. सी.ए.कुलकर्णी	श्री. सुनिल यशवंत पाटील
ॲड.पृथ्वीराज एन.कदम	
ॲड.अभिजीत एस.काळे	
ॲड.एस. बी. काळभोर	
ॲड.एस.एस.थोरात	

कृष्णा – कोयना नागरी सहकारी पतसंस्था मर्या; कराड

41 वा वार्षिक अहवाल
सन 2025-26

अध्यक्षीय मनोगत

सन्माननीय सभासद बंधू-भगिनींनो,सस्नेह नमस्कार.

आपल्या संस्थेच्या 41 व्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये उपस्थित राहिल्याबद्दल आपण सर्वांचे संचालक मंडळाच्या वतीने मनःपूर्वक स्वागत करीत आहे. दिनांक 31 मार्च 2026 अखेरच्या आर्थिक वर्षातील संस्थेचा प्रगती अहवाल, वैधानिक लेखापरीक्षकांनी प्रमाणित केलेला ताळेबंद व नफा-तोटा पत्रक आपल्या समोर सादर करताना मला विशेष आनंद होत आहे.

आर्थिक प्रगती आणि विश्वासाची परंपरा

सन 2025-26 हे वर्ष संस्थेसाठी प्रगती, स्थैर्य आणि विश्वास दृढ करणारे ठरले आहे. सभासद, ठेवीदार आणि ग्राहक यांच्या अखंड सहकार्यामुळे संस्थेने आर्थिक क्षेत्रात समाधानकारक कामगिरी नोंदविली आहे. ठेव संकलन, कर्ज वितरण, वसुली, गुंतवणूक व्यवस्थापन आणि आर्थिक शिस्त यामध्ये संस्थेने उल्लेखनीय यश प्राप्त केले आहे. बदलत्या आर्थिक परिस्थितीतही संस्थेने सुरक्षितता, पारदर्शकता आणि विश्वासार्हता या मूल्यांचा कायम पाठपुरावा केला आहे.

तंत्रज्ञानाधिष्ठित सेवा आणि डिजिटल परिवर्तन

आजच्या स्पर्धात्मक युगात डिजिटल बँकिंग ही काळाची गरज बनली आहे. ग्राहकांना अधिक वेगवान, सुरक्षित आणि सुलभ सेवा देण्याच्या उद्देशाने संस्थेने कोअर बँकिंग प्रणाली अधिक सक्षम केली असून एसएमएस अलर्ट, एबीबी सुविधा, पिग्मी मोबाईल ॲप, आरटीजीएस/एनईएफटी, बिल पेमेंट इत्यादी बँकिंग सेवांचा विस्तार केला आहे. त्यामुळे ग्राहकांना कोणत्याही वेळी आणि कोणत्याही ठिकाणाहून व्यवहार करणे अधिक सुलभ झाले आहे.

ग्राहकाभिमुख सेवा आणि विश्वासार्ह नाते

ग्राहक हेच संस्थेच्या प्रगतीचे केंद्रबिंदू आहेत. ग्राहकांच्या अपेक्षा लक्षात घेऊन संस्थेने सेवा गुणवत्तेत सातत्याने सुधारणा केली आहे. आकर्षक ठेव योजना, स्पर्धात्मक व्याजदर, सुलभ कर्ज प्रक्रिया आणि तत्पर सेवा यामुळे ग्राहकांचा संस्थेवरील विश्वास अधिक दृढ झाला आहे. ग्राहक समाधान हेच आमच्या यशाचे खरे मोजमाप असल्याची भावना आम्ही जपली आहे.

नियामक अनुपालन आणि सुशासन

सहकार विभाग तसेच नियामक मंडळाच्या मार्गदर्शक तत्त्वांचे काटेकोर पालन करून संस्थेने सुयोग्य, पारदर्शक व नियमसुसंगत कार्यपद्धतीला नेहमीच प्राधान्य दिले आहे. पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि उत्तम प्रशासन पद्धती यांचा अवलंब करून संस्थेची कार्यक्षमता अधिक सक्षम करण्यात आली आहे. जोखीम व्यवस्थापन, अंतर्गत नियंत्रण व्यवस्था आणि लेखापरीक्षण प्रक्रियेमध्ये आवश्यक सुधारणा करणेत आलेली आहेत.

सामाजिक बांधिलकी आणि पर्यावरण संवर्धन

संस्था ही केवळ आर्थिक व्यवहार करणारी यंत्रणा नसून समाजाच्या विकासाची भागीदार आहे. सामाजिक उत्तरदायित्वाचा भाग म्हणून संस्थेने वृक्षारोपण, पर्यावरण जनजागृती तसेच विविध सामाजिक उपक्रम राबविले आहेत. पर्यावरण संवर्धन, आणि हरित विकास ही काळाची गरज असून त्यासाठी संस्थेने सक्रिय योगदान दिले आहे.

सभासदांचे अमूल्य सहकार्य

संस्थेच्या यशामागे आपल्या सर्व सभासदांचे, ठेवीदारांचे, ग्राहकांचे आणि हितचिंतकांचे मोलाचे योगदान आहे. आपल्या विश्वासामुळेच संस्था सातत्याने प्रगतीपथावर आहे. संचालक मंडळ, शाखा सल्लागार, अधिकारी, सेवक वर्ग व दैनंदिन ठेव प्रतिनिधी यांनी जबाबदारीची जाणीव ठेवून केलेल्या कार्यामुळे संस्थेची प्रतिमा अधिक उंचावली आहे.

उद्याची दिशा – अधिक सक्षम आणि प्रगत संस्था

आगामी काळात संस्थेच्या सर्वांगीण विकासासाठी आम्ही अधिक आधुनिक, तंत्रज्ञानाधारित आणि ग्राहकाभिमुख सेवा उपलब्ध करून देण्यास कटिबद्ध आहोत. आर्थिक समावेशन, डिजिटल सेवा विस्तार, कर्जवाढ, ठेवींची वृद्धी, सुरक्षित व्यवहार व्यवस्था आणि उत्कृष्ट ग्राहक सेवा यांवर विशेष भर देण्यात येणार आहे. संस्थेची आर्थिक भक्कमपणा आणि सामाजिक बांधिलकी जपत प्रगतीचा नवा अध्याय लिहिण्याचा आमचा निर्धार आहे.

संस्थेच्या यशामध्ये सभासद, ठेवीदार, ग्राहक, संचालक मंडळ, महाव्यवस्थापक श्री. अरुण पाटील (आप्पा), अधिकारी, कर्मचारी वर्ग व दैनंदिन ठेव प्रतिनिधी यांचे मोलाचे योगदान आहे. त्यांच्या सहकार्यामुळे संस्थेची विश्वासार्हता आणि नावलौकिक अधिक वृद्धिंगत झाला आहे.आगामी काळातही संस्था अधिक सक्षम, आधुनिक आणि ग्राहकाभिमुख सेवा देत प्रगतीचा नवा अध्याय लिहिण्यासाठी प्रयत्नशील राहील. आपल्या सर्वांचे सहकार्य आणि विश्वास असेच कायम राहो, हिच अपेक्षा.

संस्थेने अहवाल सालात केलेल्या प्रगतीचा, संचालक मंडळाने सादर केलेला अहवाल

सभासद वाढ - विश्वासाचे वाढते बळ :-

दि.31 मार्च 2025 अखेर सभासद संख्या 3908 होती. अहवाल सालात 368 सभासद वाढ झाली असून 31 मार्च 2026 अखेर 46 सभासदांनी राजीनामे दिल्याने दि.31 मार्च 2026 अखेरची सभासद संख्या 4230 इतकी झालेली आहे.

भागभांडवल - आर्थिक बळकटीचा आधारस्तंभ :-

दि. 31 मार्च 2025 अखेर वसूल भागभांडवल रु. 3,78,88,760 /- इतके होते. त्यामध्ये रु. 24,96,650 /- ने निव्वळ वाढ होऊन ते दि.31 मार्च 2026 अखेर रु.4,03,85,410 /- एवढे झाले आहे. तरी सन 2026-27 या आर्थिक वर्षात सभासद भाग भांडवल रु. 1 कोटी 51 लाख पर्यन्त वाढीचे ध्येय संचालक मंडळाने ठेवलेले आहे.

राखीव व इतर निधी - सुरक्षिततेची हमी :-

संस्थेचा आर्थिक पाया भक्कम होणेसाठी भागभांडवला बरोबर राखीव व इतर निधीची पुरेशी तरतूद असणे महत्त्वाचे आहे. गतवर्षी संस्थेकडे एकूण निधी रु. 14,09,80,756.92 /- इतका होता. अहवाल सालात त्यामध्ये रु. 1,14,95,850/- ने वाढ होऊन दि. 31.03.2026 अखेर संस्थेकडे एकूण निधी रु.15,24,76,606.92 /- इतका झालेला आहे.

ठेवी - जनविश्वासाचे प्रतिबिंब :-

ठेवीमधील वाढ ही संस्थेच्या जनमानसातील असणाऱ्या विश्वासार्हतेचे प्रतिक आहे.दि. 31 मार्च 2025 अखेर रु. 113,06,37,069.60 /- एवढ्या ठेवी होत्या. त्यामध्ये अहवाल सालात रु. 8,06,69,851.88/- ने वाढ होऊन दि.31 मार्च 2026 अखेर रु. 121,13,06,921.48 /- एवढ्या ठेवी झालेल्या आहेत.

गुंतवणूक व निधी व्यवस्थापन - दूरदृष्टीपूर्ण नियोजन :-

संस्थेने कायद्याचे तसेच नियामक मंडळाच्या मार्गदर्शक सूचनांचे काटेकोर पालन करून उपलब्ध निधीचे योग्य नियोजन व प्रभावी व्यवस्थापन करण्यास सातत्याने प्राधान्य दिले आहे. उपलब्ध व अतिरिक्त निधीची योग्य वेळी, योग्य कालावधीसाठी सक्षम व विश्वासार्ह बँकांमध्ये सुरक्षित गुंतवणूक करून संस्थेच्या उत्पन्नात वाढ करण्यासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न करण्यात आले आहेत.

संस्थेच्या निधीचा सुरक्षितता, तरलता व लाभदायकता **(Safety, Liquidity & Profitability)** या त्रिसूत्रीचा समतोल साधून योग्य विनियोग करण्यात आला आहे. परिणामी, उपलब्ध निधीचा अधिक कार्यक्षम वापर होऊन संस्थेच्या आर्थिक स्थैर्यासोबतच उत्पन्नवाढीसही सकारात्मक हातभार लागला आहे. संस्थेच्या आर्थिक शिस्तीचे व सक्षम निधी व्यवस्थापनाचे द्योतक म्हणून अहवाल सालात संस्थेने कोणत्याही बाह्य कर्जाची (Borrowings) उचल केलेली नाही. तसेच, नियमानुसार आवश्यक असलेले CRR व SLR चे प्रमाण काटेकोरपणे राखण्यात आले आहे.

या सक्षम व दूरदृष्टीपूर्ण निधी व्यवस्थापनाच्या परिणामी, दि. 31.03.2026 अखेर संस्थेची एकूण गुंतवणूक रु. 50,29,70,943.20/- इतकी आहे. सदर गुंतवणूक ही संस्थेच्या सक्षम आर्थिक नियोजनाची, निधी व्यवस्थापनातील शिस्तीची आणि आर्थिक स्थैर्याची ठोस निदर्शक आहे.

संस्थेची तुलनात्मक सांपत्तीक स्थिती (Performance Financial Highlights) :-

अ.न.	तपशील	2024-25	2025-26
1	वसूल भागभांडवल (Paid up Share Capital)	3,78,88,760.00	4,03,85,410.00
2	राखीव व इतर निधी (Reserve & Other Funds)	14,09,80,756.92	15,24,76,606.92
3	ठेवी (Deposits)	113,06,37,069.60	121,13,06,921.48
4	कर्जे (Loans & Advances)	84,84,04,108.23	89,16,31,875.83
5	*गुंतवणूक (Investments)*	*44,06,19,412.20*	*50,29,70,943.20*
6	एकूण व्यवसाय (Total Business)	197,90,41,177.83	210,29,38,797.31
7	खेळते भांडवल (Working Capital)	136,45,53,123.45	146,17,97,453.04
9	निव्वळ नफा (Net Profit)	1,22,39,013.18	111,45,114.41
10	ऑडिट वर्ग (Audit Class)	'अ'	'अ'

कर्जे - विकासाला चालना :-

कर्ज व्यवहार हा संस्थेच्या उत्पन्नाचा मुख्य स्त्रोत आहे. त्या अनुषंगाने बदलत्या काळानुसार व ग्राहकांच्या गरजा लक्षात घेवून विविध योजना राबविण्याचा व स्पर्धात्मक व्याजदर ठेवण्याचा धोरणात्मक निर्णय घेवून कार्यवाही सुरू केलेली आहे. तसेच संस्थेची कर्ज मंजूरी व वितरण प्रक्रिया जलद व ग्राहकभिमुख करणेत आलेली आहे. सभासद ग्राहकांची आर्थिक उन्नती व्हावी हा एकमेव उद्देश डोळ्यासमोर ठेवून संचालक मंडळाने सभासदांना तत्परतेचे विना विलंब कर्जे दिलेली आहेत. त्याप्रमाणे दि.31.03.2025 अखेरचे एकूण येणे कर्ज रु. 84,84,04,108.23/ एवढे होते. त्यामध्ये अहवाल सालात रु.4,32,27,767.60/- एवढी वाढ होऊन दि.31.03.2026 अखेर एकूण येणे कर्जे रु. 89,16,31,875.83/- एवढे आहे.

संचालक व नातेवाईक कर्जे:-

तपशील	कर्ज रक्कम	31.03.2026 येणे बाकी	31.03.2026 थकबाकी
1) संचालक	1,01,50,000.00	84,54,905.00	-
2) नातेवाईक	50,00,000.00	11,51,183.00	-
एकूण -	1,51,50,000.00	96,06,088.00	-

एन.पी.ए. नियंत्रण - शिस्तबद्ध वसुलीचे यश :-

आजच्या आव्हानात्मक आर्थिक वातावरणात अनुत्पादक कर्जे नियंत्रणात ठेवणे ही मोठी कामगिरी मानली जाते. संचालक मंडळ, सेवक वर्ग आणि सभासदांच्या सहकार्यामुळे संस्थेने एन.पी.ए. नियंत्रणात ठेवण्यात यश मिळविले आहे. सातत्यपूर्ण पाठपुरावा, नियोजनबद्ध वसुली आणि कर्जदारांशी समन्वय यामुळे संस्थेचा आर्थिक पाया अधिक मजबूत झाला आहे.

अहवाल सालात बाजारातील आर्थिक मंदीमुळे सर्व बँकिंग क्षेत्राला एन.पी.ए.चे मोठे आव्हान निर्माण झाले आहे. तथापी आपले संस्थेने आर्थिक वर्षात एन.पी.ए.वसुलीचे नियोजनबद्ध प्रयत्न केलेले आहेत .तसेच कर्ज वसूलीमध्ये सातत्य ठेवलेमुळे अहवाल सालात निव्वळ एन.पी.ए. प्रमाण 7. 31 % राखण्यात यश आलेले आहे .

अनुत्पादक कर्जे (एन.पी.ए.) कर्जाकरीता दि.31.03.2026 अखेर बुडीत व संशयीत कर्ज निधी रु.5,33,29,733.13 इतका झालेला आहे. तसेच निव्वळ नफा विभागणी मधून बुडीत व संशयीत कर्ज निधी करीता रु.41,00,000/- एवढी रक्कम वर्ग करणेस मा. संचालक मंडळाने मान्यता दिलेली आहे.. त्यासाठी कर्जदारांनी आपली एन.पी.ए. मध्ये असणारी खाती नियमित करणेत यावीत . व आपले हप्ते वेळेत भरून संस्थेस सहकार्य करावे ही विनंती.

सुशासन व कार्यक्षम प्रशासन :-

अहवाल वर्षामध्ये मा. संचालक मंडळाच्या एकूण 14 सभा नियमानुसार पार पडल्या. तसेच एकूण उपसमित्या 4 असून अहवाल सालात प्रत्येकी 3 सभा झालेल्या आहेत. प्रत्येक सभेमध्ये संस्थेच्या सर्वांगीण विकास, आर्थिक स्थैर्य, सभासद हित व प्रशासनाशी संबंधित विविध *विषयांवर सखोल चर्चा करण्यात आली. सर्व निर्णय कायदेशीर तरतुदी, पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि संस्थेच्या दीर्घकालीन हिताचा* विचार करून सर्वानुमते घेण्यात आले. संचालक मंडळाने दूरदृष्टी, प्रभावी नियोजन व निर्णयक्षम नेतृत्वाच्या बळावर संस्थेच्या प्रगतीसाठी सातत्याने सकारात्मक भूमिका बजावली आहे .

सेवक वर्ग : संस्थेच्या प्रगतीचा आधार

संस्थेच्या सातत्यपूर्ण प्रगतीमध्ये सेवक वर्गाचे योगदान अत्यंत मोलाचे आहे. प्रशिक्षण, आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर आणि ग्राहकाभिमुख सेवेमुळे संस्थेची कार्यक्षमता अधिक बळकट झालेली आहे. दि. 31 मार्च 2026 अखेर संस्थेत 45 सेवक कार्यरत असून, ते समर्पित भावनेने व जबादारीने सेवा बजावत आहेत. त्यांच्या कार्यतत्परतेमुळे संस्थेच्या प्रगतीला सातत्याने चालना मिळाली आहे.

लेखा परिक्षण :-

संस्थेचे सन 2025- 26 चे वैधानिक लेखापरीक्षण मे.विनोद एल सावंत आणि कं. चार्टर्ड अकौटंट, कराड, यांनी पूर्ण केले आहे. त्यांनी संस्थेस लेखापरीक्षण वर्ग " अ " दिलेला असून संस्थेच्या कामकाजाबाबत समाधान व्यक्त केले आहे. तसेच त्यांनी केलेले बहुमोल मार्गदर्शन व सूचना याचा संस्थेच्या कामकाजामध्ये निश्चितच फायदा होईल .

सभासद हित जपणारे लाभांश धोरण :-

संस्था स्थापनेपासून सभासदांना सातत्याने लाभांश देण्याची गौरवशाली परंपरा कायम राखलेली आहे. अहवाल सालात संस्थेची आर्थिक स्थिरता व व्यावसायिक प्रगती लक्षात घेऊन, सन **2025-26** या वर्षासाठी सभासदांना **10 % लाभांश** देण्याची शिफारस संचालक मंडळाने केलेली आहे.

आर्थिक प्रगती व नफा विभागणी :-

संस्थेने कर्ज व्यवसायातील गुणात्मक वाढ, प्रभावी निधी व्यवस्थापन आणि सुयोग्य गुंतवणूक धोरणाच्या माध्यमातून अहवाल वर्षात उल्लेखनीय आर्थिक प्रगती साधली आहे.

अहवाल सालात संस्थेस ढोबळ नफा रु. 1,12,45,114.41 प्राप्त झालेला आहे. त्यामधून उत्तम जिंदगी तरतूद रु. 1,00,000/- वजा केल्यानंतर निव्वळ नफा रु. 1,11,45,114.41 इतका झालेला आहे. तसेच मागील वर्षाचा शिल्लक नफा रु. 280.73 एवढा आहे. असा एकूण नफा रु. 1,11,45,395.14 इतका झालेला आहे.

सदर नफ्याची विभागणी अधिनियम व उपविधीतील तरतुदींनुसार खालीलप्रमाणे करण्यास मा.संचालक मंडळाने मान्यता दिली असून, त्यास वार्षिक सर्वसाधारण सभेने मंजुरी द्यावी, ही विनंती.

1) राखीव निधी (Reserve Fund)	**27,90,000.00**
2) इमारत निधी (Building Fund)	**4,66.000.00**
3) बुडीत व संशयीत कर्ज निधी (Bad & Doubtful Debts Reserve)	**41,00,000.00**
4) लाभांश 10 % (Dividend)	**37,88,876.00**
5) पुढील वर्षाकरिता शिल्लक नफा (Balance carried to Balance Sheet)	**519.14**
एकुण नफा	**1,11,45,395.14**

भावपूर्ण श्रद्धांजली :-

अहवाल वर्षात देशाच्या रक्षणासाठी सर्वोच्च बलिदान देणाऱ्या शहीद जवानांना तसेच जागतिक, राष्ट्रीय व सहकार क्षेत्रातील मान्यवर व्यक्ती, आपल्या संस्थेचे माजी संचालक, सभासद, ठेवीदार, कर्जदार, अधिकारी-कर्मचारी, खातेदार, हितचिंतक आणि अहवाल वर्षात दिवंगत झालेल्या सर्व ज्ञात-अज्ञात व्यक्तींना संस्थेच्या वतीने विनम्र अभिवादन करून भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात येत आहे.

कृतज्ञता, आभार व समारोप :-

संस्थेच्या सातत्यपूर्ण प्रगतीमध्ये सर्व सन्माननीय सभासद, ठेवीदार, खातेदार, कर्जदार, हितचिंतक व ग्राहक यांचे मोलाचे सहकार्य लाभले आहे. संस्थेवरील त्यांचा दृढ विश्वास, आत्मीयता आणि सहकार्य यामुळेच संस्था सातत्याने प्रगतीच्या दिशेने वाटचाल करीत आहे. या विश्वासाबद्दल मा. संचालक मंडळाच्या वतीने मी सर्वांचा मनःपूर्वक ऋणी असून, त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करतो.

संस्थेच्या प्रगतीमध्ये सहकार विभागातील अधिकारी, वैधानिक लेखापरीक्षक, करसल्लागार, सातारा जिल्हा व कराड तालुका *सहकारी पतसंस्था फेडरेशन, कायदेविषयक सल्लागार, मूल्यांकन तज्ज्ञ, प्रसारमाध्यमे, चौगुले सॉफ्टवेअर प्रा. लि., सोहम इन्फोटेक,* तसेच विविध सहकारी, राष्ट्रीयीकृत व खासगी बँकांनी वेळोवेळी दिलेल्या सहकार्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार.

संस्थेचे महाव्यवस्थापक श्री.अरुण पाटील (आप्पा) तसेच सर्व अधिकारी व सेवक यांनी समर्पित भावनेने केलेल्या कार्याबद्दल त्यांचे विशेष अभिनंदन व मनःपूर्वक आभार.

संचालक मंडळाच्या वतीने संस्थेचा दि. 31 मार्च 2026 अखेरचा ताळेबंद, नफा-तोटा पत्रक, नफा विभागणीचा प्रस्ताव तसेच सन 2026-27 या वर्षासाठीचे अंदाजपत्रक आपल्या मान्यतेसाठी सादर करीत आहोत. या सर्व बाबींना आपण वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये मान्यता द्यावी, ही नम्र विनंती.

आपला विश्वास, सहकार्य आणि पाठबळ यामुळेच संस्था भविष्यातही अधिक सक्षम, पारदर्शक आणि प्रगतीशील वाटचाल करेल, असा आम्हाला दृढ विश्वास आहे.

जय हिंद! जय महाराष्ट्र!! जय सहकार!!!

आपला स्नेहांकीत

श्री. बाळासो शामराव पाटील
चेअरमन

मे. विनोद एल. सावंत ॲण्ड कंपनी
चार्टर्ड अकौंटंट्स
प्लॉट नं. 146/अ, बुधवार पेठ,
श्री केलामाता अपार्टमेंट, पहिला मजला,
कराड. - 415110
फोन : 228515 मो. 9423033216

नमुना ' एन 2 '
[कलम 81 आणि नियम 69 (3) पहा]

प्रति,
मा. चेअरमनसो,
कृष्णा कोयना नागरी सहकारी पतसंस्था मर्या.,
कराड
संदर्भ : – वार्षिक सर्वसाधारण सभा दिनांक 10.08.2025 ठराव क्र. 7 नुसार केलेली नियुक्ती.

वैधानिक लेखापरिक्षक म्हणून आर्थिक विवरणांचा अहवाल

1. कृष्णा कोयना नागरी सहकारी पतसंस्था मर्या., कराड, यांचे आर्थिक विवरणाचे लेखापरिक्षण आम्ही केले आहे. त्यामध्ये ताळेबंदपत्रक 31 मार्च 2026 पर्यंतचे असून, वर्षाच्या अखेरीपर्यंतचे नफा आणि तोटा विवरणपत्रक आणि हिशेबांच्या धोरणाचा अर्थपूर्ण सारांश आणि इतर स्पष्टीकरणात्मक माहिती दिलेली असून, संस्थेचे लेखापरिक्षण आम्ही 1 एप्रिल 2025 ते 31 मार्च 2026 पर्यंतचे केले आहे.

व्यवस्थापनाची आर्थिक विवरणपत्राबाबतची जबाबदारी

2. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, 1960 आणि त्याखाली बनविलेले नियम या अन्वये आर्थिक विवरणपत्र तयार करण्याची जबाबदारी व्यवस्थापनाची आहे. या जबाबदारीमध्ये संकल्पना करणे, अंमलात आणणे, आर्थिक विवरण तयार करण्याबाबत अंतर्गत नियंत्रण संबंधात महत्वाच्या चुकीच्या विवरणपत्रामधून मुक्त राहील, मग ती फसवणूक किंवा चुकीमुळे असेल.

लेखापरिक्षकाची जबाबदारी

3. केलेल्या लेखापरिक्षणावर मत व्यक्त करणे ही आमची जबाबदारी आहे व ते आम्ही केलेल्या लेखापरिक्षेच्या पायावर आहे. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम आणि दि इन्स्टिटयूट ऑफ चार्टर्ड अकौंटंट्स ऑफ इंडिया प्रमाणाप्रमाणे लेखापरिक्षणाचे आम्ही संचालन केले आहे. अशा प्रमाणभूत नीतितत्वाच्या पालनाची जरूरी आहे व ती आम्ही पाळली आहे. आणि लेखापरिक्षण योग्य आश्वासनपूर्ती मिळविण्याच्या दृष्टीने आर्थिक विवरण महत्वाच्या चुकीच्या विवरण पत्रापासून मुक्त राहील व ते फसवणूक किंवा चुकीमुळे असेल त्याचे पालन आम्ही केले आहे.

4. लेखापरिक्षेमध्ये लेखापरिक्षणामधील जे उघड न केलेले आणि रक्कम यातील पुरावा जमा करणे ही याची पध्दत आहे व ते लेखापरिक्षकाच्या अभिप्रायावर अवलंबून आहे; यामध्ये महत्वाच्या चुकीच्या आर्थिक विवरणपत्रामधील धोक्याचे निर्धारण करण्याची पध्दत जर ती फसवणूक किंवा चुकीमुळे असेल त्यावर अवलंबून आहे. संस्थेने तयार केलेले आर्थिक विवरण अंतर्गत नियंत्रण आणि रास्त सादरीकरण विनियोजनाच्या वापराची पध्दत उचित परिस्थितीत योग्य आहे. लेखापरिक्षेमध्ये जमाखर्चाच्या मुल्यांकनाच्या विनियोजनाचा वापर, आणि जमाखर्चाचा अंदाज त्याचप्रमाणे संपूर्ण आर्थिक विवरणपत्राचे सादरीकरण यांचा समावेश होतो.

5. लेखापरिक्षेचा पुरावा जो आम्ही मिळविला आहे तो अभिप्रायाचा पाया म्हणून पुरेसा आणि योग्य आहे असा विश्वास आहे.

अभिप्राय

6. आमच्या मतानुसार आणि आम्हास मिळालेल्या पूर्ण माहितीनुसार आणि आम्हाला दिलेल्या स्पष्टीकरणानुसार महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, 1960 आणि महाराष्ट्र सहकारी संस्था नियम, 1961 आणि इतर लागू होणारे अधिनियम आणि निबंधकांनी प्रसिध्द केलेली संस्थेला जरूरीची असणारी परिपत्रके आणि योग्य व उचित बळकटी आणण्यासाठी उचित दृष्टिकोन जो सर्वसाधारणपणे भारतात मान्य केला आहे. आमचे स्वतंत्र लेखापरीक्षण अहवाल भाग क्र. अ, ब व क मधील शेऱ्यांस पात्र राहून

(1) ताळेबंदाचे बाबतीत दिनांक 31 मार्च 2026 ची संस्थेची सांपत्तिक स्थितीची व
(2) नफा तोटा पत्रकाचे बाबतीत, त्या दिनांकास संपणाऱ्या नफ्याची सत्य व रास्त स्थिती दर्शवितात.

इतर कायदेशीर आणि नियामक बाबींवरील अहवाल

7. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमातील तरतुदीनुसार ताळेबंदपत्रक व नफा तोटा विवरणपत्रके तयार केलेली आहेत.
8. आम्ही अहवाल देतो की,
(अ) आम्हाला मिळालेल्या माहितीनुसार आणि स्पष्टीकरणानुसार, जे आमच्या लेखापरिक्षणासाठी जरूर आहे ते मिळालेल्या पु–या माहितीनुसार आम्हास असे आढळून आले आहे की, ते समाधानकारक आहे.
(ब) संस्थेचे व्यवहार आमच्या दृष्टीस आल्याप्रमाणे संस्थेच्या अधिकारांत करण्यात आले आहेत.
(क) आमच्या लेखापरिक्षणासाठी संस्थेच्या कार्यालयाकडून व तिच्या शाखांकडून आलेली विवरणपत्रे योग्य आहेत.
9. लेखांकन मानकाप्रमाणे ताळेबंदपत्रक व नफा तोटा हिशेब यांचे अनुपालन आमच्या मताप्रमाणे योग्य आहे.
10. आम्ही आणखी पुढील अहवाल करतो
(1) या अहवालासंदर्भात ताळेबंदपत्रक आणि नफा आणि तोटा आणि खर्चाचा हिशेब हे हिशोबाची पुस्तके आणि विवरणपत्रे यांचा योग्य मेळ बसत आहे.
(2) आम्ही पुस्तकांची तपासणी केल्यानंतर संस्थेने योग्य ती ताळेबंदपत्रके जी अधिनियमानुसार जरूरीची आहेत ती सर्व व्यवस्थित आहेत.
(3) लेखापरीक्षण केलेल्या सन 2025–26 या वर्षासाठी संस्थेस "अ" वर्ग प्रदान करण्यात आलेला आहे.

मे. विनोद एल. सावंत ॲण्ड कंपनी
चार्टर्ड अकौंटंट्स करिता

ठिकाण :– कराड
दिनांक :– 31.07.2026

M/s. Vinod L. Sawant & Company * Chartered Accountants * M.No.105138 KARAD

(सीए. विनोद एल. सावंत)
प्रोप्रायटर
सहकार लेखापरीक्षण तालिका क्रमांक :– 18302
UDIN – 26105138ELIKPA3014

कृष्णा – कोयना नागरी सहकारी पतसंस्था मर्या; कराड.

ताळेबंद पत्रक (BALANCE SHEET AS ON 31st MARCH 2026)

31.03.2025		भांडवल व देणी (LIABILITIES)	31.03.2026
4,00,00,000.00	1	अ)अधिकृत भाग भांडवल (Authorized Share Capital)	5,00,00,000.00
		(500000 शेअर्स रु.100 प्रमाणे)	
3,78,88,760.00		ब)वसूल झालेले भाग भांडवल (Paid up Share Capital)	4,03,85,410.00
14,09,80,756.92	2	राखीव निधी व इतर निधी (Reserve & Other fund)	15,24,76,606.92
113,06,37,069.60	3	ठेवी व इतर खाती (Deposits &Other Accounts)	121,13,06,921.48
0.00	4	बाहेरील कर्जे (Borrowings)	0.00
7,42,30,336.00	5	थकव्याज तरतूद (Overdue Interest Provision)	8,18,18,741.00
3,94,99,819.00	6	देणे व्याज (Interest Payable)	4,25,50,982.00
0.00	7	शाखा व्यवहार (Branch Adjustment)	0.00
33,07,469.20	8	इतर देणी (Other Payables)	39,32,137.50
1,22,39,248.73	9	नफा - तोटा खाते (Profit & Loss Account) मागील शिल्लक नफा - 280.73 चालू नफा - 11145114.41	1,11,45,395.14
143,87,83,459.45		एकुण	**154,36,16,194.04**

नफा - तोटा पत्रक (PROFIT & LOSS ACCOUNT FOR THE YEAR ENDED 31.03.2026)

31.03.2025		खर्च (EXPENDITURE)	31.03.2026
9,04,61,368.00	1	व्याज दिलेले (कर्जावरील व ठेवीवरील) (Interest Paid)	9,80,68,904.00
1,07,76,416.00	2	पगार ,प्रा.फंड,सेवक बोनस (Salary & Allowances)	1,19,90,206.00
6,57,028.00	3	भाडे, कर ,विमा इ. (Rent, Taxes, Insurance etc)	6,83,128.00
4,05,110.13	4	इलेक्ट्रिक व टेलिफोन खर्च इ. (Electric & Telephone Exp)	3,13,071.08
9,17,652.00	5	ऑडीट फी (Audit Fee)	9,45,347.00
22,26,280.12	6	मालमत्ता झीज व दुरूस्ती (Depreciation & Maintenance)	20,78,202.00
4,45,587.10	7	स्टेशनरी,छपाई व जाहिरात (Stationery, Printing & Advertisement)	5,23,472.00
43,546.00	8	प्रशिक्षण खर्च (Training Exp)	42,200.00
1,16,226.00	9	प्रवास खर्च (Travelling Exp)	49,729.00
27,66,710.00	10	इतर खर्च व तरतूदी (Other Expenses & provision)	26,89,726.10
1,22,39,013.18	11	नफा ताळेबंदाकडे वर्ग (Net Profit)	1,11,45,114.41
12,10,54,936.53		एकुण	**12,85,29,099.59**

संचालक

श्री.आनंदराव भाऊसो पाटील | श्री. सुरेश रघुनाथ शिंदे | श्री.अभय धोंडीराम धोपाटे | श्री.दत्तात्रय धोंडूसा कलबुर्गी

श्री.प्रकाश यशवंत पाटील | श्री.सुभाष केशव काळे | श्री.प्रशांत अरुण पाटील | श्री.यशवंत विठ्ठल ढेबे

श्री.महेश शिवाजी कांबळे | सौ.रोहिणी रामचंद्र लाखोले | श्वेता अरुण पाटील

कृष्णा – कोयना नागरी सहकारी पतसंस्था मर्या; कराड.

दिनांक 31 मार्च 2026 अखेरचे

31.03.2025		जिंदगी व मालमत्ता (ASSETS)	31.03.2026
5,07,48,236.95	1	रोख शिल्लक व बँकेतील शिल्लक (Cash In Hand & Balance With Banks)	3,78,28,307.65
44,06,19,412.20	2	गुंतवणूक (Investment)	50,29,70,943.20
84,84,04,108.23	3	कर्जे (loans & Advances)	89,16,31,875.83
1,27,34,990.00	4	स्थावर व जंगम मालमत्ता (Fixed Assets)	1,78,98,197.00
0.00	5	शाखा व्यवहार (Branch Adjustment)	0.00
7,95,90,585.00	6	येणे व्याज (Interest Receivable)	8,41,51,752.42
66,86,127.07	7	इतर येणी (Other Receivables)	91,35,117.94
143,87,83,459.45			**154,36,16,194.04**

दिनांक 31 मार्च 2026 अखेरचे

31.03.2025		उत्पन्न (INCOME)	31.03.2026
11,97,22,958.44	1	व्याज मिळालेले (कर्जावरील व गुंतवणुकीवरील) (Interest Received)	12,69,89,257.20
62,948.09	2	कमीशन (Commission)	53,800.35
12,69,030.00	3	इतर उत्पन्न (Other Income)	14,86,042.04
12,10,54,936.53			**12,85,29,099.59**

श्री. बाळासो शामराव पाटील
चेअरमन

श्री.सचिन विठ्ठल चव्हाण
व्हा.चेअरमन

श्री. अरुण शंकर पाटील
महाव्यवस्थापक

सोबत जोडलेल्या आमच्या त्याच दिनांकाच्या अहवालास अनुसरून वैधानिक लेखापरीक्षक,
मे.विनोद एल सावंत आणि कं. चार्टर्ड अकौटंट, कराड

कृष्णा – कोयना नागरी सहकारी पतसंस्था मर्या; कराड.

सन 2026-27 सालासाठी सुचविलेले खर्चाचे अंदाज पत्रक

तपशील	अंदाज पत्रक 2025-26	प्रत्यक्ष खर्च सन 2025-26	कमी /जादा खर्च	अंदाज पत्रक 2026-27
व्याज दिलेले (कर्जावरील व ठेवीवरील)	10,07,00,000.00	98068904.00	-2631096.00	101650000.00
पगार,प्रा.फंड,संस्था वर्गणी, सेवक बोनस,सेवक प्रवास इ	*1,29,12,000.00*	*11990206.00*	*-921794.00*	*15013000.00*
ऑफिस भाडे, कर ,आयकर , विमा इ .	9,98,000.00	683128.00	-314872.00	1063100.00
इलेक्ट्रिक व टेलिफोन खर्च इ	5,20,500.00	313071.08	-207428.92	535200.00
ऑडीट फी	9,75,000.00	945347.00	-29653.00	1003000.00
मालमत्ता झीज व दुरूस्ती	38,20,000.00	2078202.00	-1741798.00	4013000.00
स्टेशनरी,छपाई व जाहिरात	7,85,000.00	523472.00	-261528.00	792000.00
प्रशिक्षण खर्च	75,000.00	42200.00	-32800.00	65000.00
प्रवास खर्च	1,78,000.00	49729.00	-128271.00	152000.00
इतर खर्च व तरतूदी	45,00,000.00	2689726.10	-1810273.90	4940000.00
निव्वळ नफा	1,61,00,000.00	11145114.41	-4954885.59	14400000.00
एकूण	14,15,63,500.00	128529099.59	-13034400.41	143626300.00

सन 2026-27 सालासाठी सुचविलेले उत्पन्नाचे अंदाज पत्रक

तपशील	अंदाज पत्रक 2025-26	प्रत्यक्ष उत्पन्न सन 2025.26	प्रत्यक्ष कमी /जादा उत्पन्न	अंदाज पत्रक 2026.27
व्याज मिळालेले (कर्जावरील व गुंतवणुकीवरील)	13,81,75,500.00	126989257.20	-11186242.80	139978300.00
कमीशन	4,76,000.00	53800.35	-422199.65	515000.00
इतर उत्पन्न	29,12,000.00	1486042.04	-1425957.96	3133000.00
एकूण	14,15,63,500.00	128529099.59	-13034400.41	143626300.00

परिशिष्ट " अ "

संस्थेचे नांव	:- **कृष्णा – कोयना नागरी सहकारी पतसंस्था मर्या; कराड.**		
पत्ता	:- प्रशासकीय कार्यालय,135/2, मंगळवार पेठ, कराड फोन नं. (02164)-221041.		
नोंदणी क्र.	:- एस.ए.टी./के.आर.डी./आर.एस.आर./(सी.आर.)730 दि.20 मार्च 1986		
कार्यक्षेत्र	:- सातारा जिल्हा		
शाखा	:- प्रशासकीय कार्यालय व 9 शाखा कार्यालये		
सभासद संख्या	:- 4230		
अधिकृत भाग भांडवल	:- 5 कोटी		
वसुल भागभांडवल	:- 403.85 लाख		
राखीव निधीव इतर निधी	:- 1524.77 लाख		
ठेवी	:- मुदत ठेव व इतर ठेवी	:- 11564.86	लाख
	:- चालू ठेव	:- 135.52	लाख
	:- सेव्हिंग ठेव	:- 412.69	लाख
कर्जे	:- तारणी कर्जे	:- 7712.82	लाख
	:- विनातारणी कर्जे	:- 218.43	लाख
	:- ठेवतारणी कर्जे	:- 985.07	लाख
गुंतवणूक	:- 5029.71 लाख		
बाहेरील कर्जे	:- निरंक		
एकूण सेवक वर्ग	:- 45		
नफा	:- 111.45 लाख		
खेळते भांडवल	:- 14617.97 लाख		
लाभांश	:- 10 % प्रस्तावित		
लेखापरीक्षण वर्ग	:- 'अ'		

शाखा कार्यालये

अ.क्र	शाखा	स्थळ	फोन नंबर	मोबाईल नं
1	प्रशासकीय कार्यालय	135/2, मंगळवार पेठ, कराड 415110	(02164) 221041	9850110723
2	शाखा मंगळवार पेठ, कराड	135/2, मंगळवार पेठ, कराड 415110	(02164) 221041	9922444859
3	शाखा मसूर	युवराज पाटील कॉम्प्लेक्स, जुने एस.टी.स्टॅंड चौक, मसूर, ता. कराड, जि. सातारा. 415106	(02164) 252696	9922444858
4	शाखा मलकापूर	कुसुम रेसिडेंसी शेजारी, पुना बेंगलोर हायवे, मलकापूर, ता. कराड, जि.सातारा. 415539	(02164) 243059	9922444861
5	शाखा उंब्रज	शिवाजी पुतळ्याजवळ, उंब्रज, ता. कराड, जि.सातारा. 415109	(02164) 264218	9922444851
6	शाखा विद्यानगर	कृष्णा कॅनॉल, विद्यानगर, सैदापूर ता. कराड, जि. सातारा 415124	(02164) 273981	9922444857
7	शाखा तळमावले	कराड ढेबेवाडी रोड, तळमावले, ता. पाटण, जि. सातारा.415103	(02372) 272440	9922444860
8	शाखा नवारस्ता	कराड पाटण रोड, नवारस्ता, ता. पाटण, जि. सातारा. 415205	(02372) 274026	9922444862
9	शाखा रेठरे बु. (जुळेवाडी)	मु.जुळेवाडी,पो.शिवनगर (रेठरे बु.) ता. कराड, जि. सातारा 415108	(02164) 266300	9623702322
10	शाखा पाटण	जय कॉम्प्लेक्स,पोस्ट ऑफिस समोर,कराड चिपळूण रोड पाटण, ता. पाटण, जि. सातारा. 415206	(02372) 282603	8956475856

कृष्णा – कोयना नागरी सहकारी पतसंस्था मर्या; कराड

शाखा सल्लागार समिती

शाखा – मंगळवार पेठ,कराड	मसुर	शाखा-मलकापूर	शाखा-उंब्रज
श्री.अस्लम रसूल मुल्ला	श्री.नंदकुमार संपतराव जगदाळे	श्री.संदीप बबनराव पाटील	श्री.सुरेश भिकु चव्हाण
श्री.गजानन शंकर लोखंडे	श्री.रामचंद्र बाजीराव पवार	श्री.काशिनाथ शामराव पवार	श्री.संभाजी विठ्ठल अर्जुगडे
श्री.शेखर शिवाजीराव मोरे	श्री.आनंदराव बाबुराब चव्हाण	श्री.डॉ.उल्हास प्रकाश कुंभार	श्री.दिलीप दिनकर साळुंखे
	श्री शंकर मारुती मोरे	श्री.राजेंद्र विठ्ठल मासाळ	श्री.वरद जगन्नाथ क्षिरसागर
	श्री.लक्ष्मण कृष्णा जाधव	श्री.संजय शंकरराव पारखे	श्री.कृष्णराव बाबुराव कुंभार
	श्री.महेंद्र शिवाजी चव्हाण	श्री.निलेश दिपक पटेल	श्री.राजेंद्र आनंदराव चव्हाण
	श्री.पांडुरंग श्रीरंग शेडगे	श्री.बाळकृष्ण रतु शिंदे	श्री.नानासो रामचंद्र शिंदे
	श्री.शिवाजीराव खंडू सुतार	सौ.शिला सुनिल बसुगडे	श्री. आप्पासो शंकर मोरे
	श्री.निवास शंकरराव पाटील		
	श्री.धिरज वसंतराव पाटील		
	श्री.इंद्रजीत तानाजी पाटील		

शाखा-विद्यानगर	शाखा-तळमावले	शाखा-नवारस्ता	शाखा-रेठरे बु.II(जुळेवाडी)
श्री.उत्तमराव आनंदराव कणसे	श्री.तुकाराम सिताराम सुपुगडे	श्री.विजय भाऊसो पवार	श्री.महादेव मारुती सोमदे
श्री.संजय सोपानराव चव्हाण	श्री.विजयकुमार बाबुराव काळे	श्री.प्रकाश बळवंत पवार	श्री.बाजीराव नारायण थोरात
श्री.विजय बाळकृष्ण जाधव	श्री.महादेव गणपती देसाई	श्री.दिपक निवृती लुगडे	श्री.सदाशिव महादेव कदम
श्री.शिवाजी हणमंतराव कदम	श्री.चंद्रकांत रामचंद्र पाचुपते	श्री.संजय दत्तात्रय माने	श्री.हणमंत बाबुराव देशमुख
श्री.अनिल लक्ष्मण जाधव	श्री.संभाजी ज्ञानू करपे	श्री.राहुल शंकरराव पाटील	श्री.नेताजी पांडुरंग देशमुख
श्री.प्रा.दिलीप कृष्णा खोत	श्री.अनिल राजाराम भिसे	श्री.हणमंत खाशाबा पवार	श्री.हणमंत पांडुरंग काळे
श्री.शंकर विश्वनाथ नाईगडे	श्री.राजेंद्र विजय सरकाळे	श्री.उमेश मोहनराव देसाई	श्री.अशोक मारुती सोमदे
श्री.संजय वसंतराव पाटील	श्री.भगवान रावजी मोरे		
श्री.दाजीराम बाबुराव जाधव	श्री.जितेंद्र जगन्नाथ कोळेकर		
श्री.प्रशांत संपतराव पाटील	श्री.मोहन यशवंत पवार		
श्री. सुभाष दिनकर पानस्कर	श्री सुनील खाशाबा चाळके		
श्री.प्रा.बाजीराव मारुती पाटील			

शाखा-पाटण		
श्री.डॉ.राहुल राजाराम साळुंखे	श्री.धैर्यशील आप्पासाहेब पाटणकर	श्री.शाम महादेव कुंभार
श्री.लक्ष्मण कृष्णत चव्हाण	श्री.सूर्यकांत जनार्दन ऐर	श्री प्रकाश विश्वनाथ शिंदे
श्री सुनील महिपती घाडगे		

कृष्णा – कोयना नागरी सहकारी पतसंस्था मर्या; कराड.

सेवक वर्ग

मुख्य कार्यालय

अरुण शंकर पाटील	महाव्यवस्थापक
श्रीकांत अमृत चव्हाण	व्यवस्थापक
विजय राजाराम भिसे	ऑफिसर
दिलीप चंद्रु जाधव	ऑफिसर
सर्जेराव भिमराव साळुंखे	ऑफिसर
किशोर हणमंत कुंभार	विकास अधिकारी
लक्ष्मण विलास पवार	लेखनिक

विद्यानगर, कराड

अविनाश आण्णाजी पवार	शाखा प्रमुख
ज्योती किरण बंके	पासिंग ऑफिसर
शारदा पांडुरंग पाटील	लेखनिक
विनोद सर्जेराव मोरे	लेखनिक

मंगळवार पेठ, कराड

तुकाराम विष्णु पाटील	शाखा प्रमुख
स्मिता महादेव तुपे	लेखनिक
प्रवीण नाना शिरसाट	लेखनिक
संतोष तानाजी जाधव	लेखनिक
स्मिता अधिकराव पाटील	लेखनिक
पल्लवी श्रीपाद कोळी	लेखनिक
सुयोग अण्णासाहेब वनकुद्रे	शिपाई

तळमावले

पांडुरंग शंकर मस्कर	शाखा प्रमुख
श्रीरंग चंद्रु करपे	विकास अधिकारी
पुनम संदीप पाटील	पासिंग ऑफिसर

मसूर

लक्ष्मण आकाराम मोरे	शाखा प्रमुख
महादेव गोपाळ सूर्यवंशी	ऑफिसर
धनाजी शिवाजी पवार	लेखनिक
सुनील खाशाबा वारे	शिपाई

नवारस्ता

विराज काशीनाथ चव्हाण	शाखा प्रमुख
अरुण तानाजी घाडगे	लेखनिक
सचिन मल्हारी भिसे	लेखनिक

मलकापूर

शुभम दत्तात्रय तारळेकर	शाखा प्रमुख
अंकुश बापूराव पवार	विकास अधिकारी
मनिषा सुनील थोरात	पासिंग ऑफिसर
गंगाराम सुरेश पवार	शिपाई

रेठरेबु.॥ (जुळेवाडी)

यशवंत शंकर कचरे	शाखा प्रमुख
संदीप रघुनाथ कदम	लेखनिक
शुभांगी प्रसाद पाटील	लेखनिक
संकेत अर्जुन साळुंखे	लेखनिक

उंब्रज

विजय रामचंद्र शिंदे	शाखा प्रमुख
दिपक प्रभाकर लोहार	विकास अधिकारी
स्नेहल विनायक महाजन	पासिंग ऑफिसर
प्रेमला दिलीप थोरात	लेखनिक

पाटण

दशरथ राजाराम येडगे	शाखा प्रमुख
आकाश दादासो जाधव	लेखनिक
विशाल तुळशीदास खैरमोडे	लेखनिक
रविराज बाळासो माळी	लेखनिक

ISO 9001- 2015

कृष्णा-कोयना

नागरी सहकारी पतसंस्था मर्या; कराड

* शाखा *

। मंगळवार पेठ,कराड । मसूर । मलकापूर । उंब्रज । विद्यानगर,कराड ।

। तळमावले । नवारस्ता । रेठरे बु:(जुळेवाडी) । पाटण ।